सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०५ | शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





**श्री. राहुल पाटील**
शिक्षक प्रतिनिधी – खा. शि. मंडळ



**श्री. राहुल पाटील**
पोलीस दल



**श्री. उज्वल केले**
पुणे/अमळनेर



**प्रा. संदीप नेरकर**
अमळनेर



**श्री. किशोर बागुल**
महसूल विभाग



**श्री. लक्ष्मण पंजाबी**
दुर्गा मेडिकल



**श्री. मनोज कोठारी**
अमळनेर



**श्री. लिनेश खैरनार**
सेवेकरी, मंगळग्रह मंदिर

## भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान चळवळ

# अमळनेरच्या मातीचा सोहळा
# भूमी सुपोषण रथाचा गावोगावी जागर

## रासायनिक विळख्यातून धरतीमातेला सोडवण्याचा निर्धार!







*अमळनेर : भूमी सुपोषण चळवळ याबाबत ग्रामस्थ व शेतकरी बांधव उपस्थित राहून माहिती जाणून घेत आहेत. (छायाचित्रे : शुभम शिसोदे)*

**दि. १६ ला सायंकाळी या गावांना जनजागर रथाने दिली भेट**

हेडावे,रडावण,राजोरे,सुंदरपट्टी, सारबेटे खुर्द, सारबेटे बुद्रुक, पळासदळे व एकरुखी या गावातील ग्रामस्थांना एकत्र करून भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान याबद्दल माहिती देण्यात आली तसेच शेतकऱ्यांच्या शंकांचे निराकरण करण्यात आले.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : ज्या मातीने आपल्याला जन्म दिला, जिने आपल्याला अन्नाचा घास भरवला, ती आपली धरतीमाता आज रासायनिक खतांच्या अतिवापराने घायाळ झाली आहे. आपल्या या अन्नदात्या भूमीला पुन्हा एकदा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आणि शेतीला तिचे गतवैभव मिळवून देण्यासाठी अमळनेर तालुक्यात भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाचा झंझावात सुरू झाला आहे.

११ एप्रिलपासून सुरू झालेली ही जनजागृतीची मशाल आता तालुक्यातील कानाकोपऱ्यात पोहोचत आहे. गुरुवार, दि. १६ एप्रिल रोजी अभियानाचा जनजागर रथ शिरुड गावात दाखल झाला, तेव्हा ग्रामस्थांनी त्याचे उत्साहात स्वागत केले. त्यानंतर हा रथ जिराळी, इंधवे, इंदापिंपरी, कावपिंपरी, बहादरवाडी आणि खोकरपाट अशा गावांमध्ये पोहोचला. रथावरील ध्वनिक्षेपकातून निघणारे आवाहन करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना विषमुक्त शेती कडे वळण्याचे आवाहन केले जात आहे.तालुक्यातील ३ कृषी मंडळांतील तब्बल १५६ गावांना हा रथ भेट देणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे या मोहिमेला मोलाचे सहकार्य लाभत आहे.मोहिमेचा विशेष भाग म्हणून ६ प्रमुख गावांमध्ये अत्यंत भक्तीभावाने भूमीमाता पूजन सोहळा पार पडणार आहे.रासायनिक शेतीचे दुष्परिणाम आणि जैविक शेतीचे फायदे सांगणारी माहितीपत्रके प्रत्येक घरात पोहोचवली जात आहेत. ही चळवळ आता केवळ एक अभियान राहिलेले नसून ते एक लोकआंदोलन बनू पाहत आहे. अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था यांनी तालुक्यातील प्रत्येक शेतकरी बांधवाला या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आपली भूमी वाचली, तरच आपला शेतकरी आणि पर्यायाने देश वाचेल, हाच संदेश या रथाच्या माध्यमातून घराघरात पोहोचत आहे.


**अमळनेरसह जिल्हा होरपळणार!**

## सावधान! सूर्य आग ओकणार आणि पाऊसही झोडपणार



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यात आधीच उन्हाचा तडाखा वाढलेला असताना पुढील काही दिवस एप्रिल हीटचे चटके बसण्याची शक्यता आहे. तापमान १.५ ते ३.५ अंशाने वाढून पारा ४५ पर्यंत जाण्याची चिन्हे आहेत. वातावरणात तयार झालेल्या उच्च दाबाच्या पट्ट्यामुळे भीषण उष्णतेचा सामना करावा लागणार आहे. बुधवारी शहरात ४२ अंश तापमान नोंदवण्यात आले. हवामान अभ्यासक यांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्य भारत आणि महाराष्ट्रावर सध्या वातावरणाच्या खालच्या व मध्यम थरात उच्च दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. औटसायक्लोन प्रक्रियेत हवा खाली येणार असल्याने उष्णतेची लाट अधिक तीव्र होणार आहे जिल्ह्यात २० ते २४ एप्रिल दरम्यान स्थानिक संवहन प्रक्रियेतून अवकाळी पावसाची शक्यता आहे; मात्र या पावसामुळे नागरिकांना उष्णतेपासून फारसा दिलासा मिळणार नाही. उलट, पावसापूर्वी निर्माण होणाऱ्या बाष्पामुळे उकाड्यात आणि आर्द्रतेत मोठी भर पडण्याची शक्यता आहे. अरबी समुद्राकडून विकसित झालेले वेस्टर्न डिस्टर्बन्स कमकुवत झाल्याने महाराष्ट्रावर उच्च दाबाचा पट्टा मजबूत झाला आहे. अँटिसायक्लोन ही सामान्य प्रक्रिया असली, तरी ग्लोबल वॉर्मिंगमुळे तीव्रता अधिक वाढली आहे.



सिद्धी पाटील | चैतन्या वारके | निशा पाटील | मानसी पाटील

# स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलचा दहावी 'सीबीएसई'चा १०० टक्के निकाल


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये मार्च महिन्यात झालेल्या दहावीच्या सीबीएसई परीक्षेत स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचे नाव उंचावले आहे.

यंदाच्या निकालात विद्यार्थ्यांनी उज्ज्वल कामगिरी करत गुणवत्तेची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.या परीक्षेत सिद्धी भानुदास पाटील हिने ९६.६% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. चैतन्या वारके हिने ९६.२% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर निशा पाटील व मानसी पाटील यांनी प्रत्येकी ९५.८% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

शाळेच्या एकूण ४० विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले असून १९ विद्यार्थ्यांनी ८५% पेक्षा जास्त गुण मिळवत मिळवले आहे. तसेच सर्व विद्यार्थी हे विशेष प्राविण्यसहित उत्कृष्ट श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावला आहे.या यशाबद्दल शाळेचे मार्गदर्शक श्री बजरंग जी अग्रवाल, संस्थापक अध्यक्ष नीरज अग्रवाल, अध्यक्षा सौ सीतिका अग्रवाल, व्यवस्थापन सदस्या ममता अग्रवाल,आचल अग्रवाल,चेअरमन डी डी पाटील, मुख्याध्यापक विनोद अमृतकर यांनी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. शाळेतील शिक्षकांनी नियमित सराव परीक्षा व मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांची भक्कम तयारी करून घेतल्यामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# अमळनेर क्रीडा संकुलाला मद्यप्यांचा विळखा
# खेळाडूंना सकाळी हाती घ्यावा लागतोय झाडू!




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मारवड रस्त्यावरील शासकीय क्रीडा संकुल रात्रीच्या वेळी दारुड्यांचा अड्डा बनत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. काही दारूडे परिसरात दारूच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे रॅपर व इतर कचरा टाकून जातात. त्यामुळे सकाळी व्यायाम आणि सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंना स्वच्छता मोहीम राबवावी लागत आहे.

या क्रीडा संकुलात दररोज सकाळ-संध्याकाळ युवक व युवती रनिंग, व्यायाम आणि विविध खेळांचा सराव करण्यासाठी येतात. शारीरिक तंदुरुस्ती आणि क्रीडा संस्कृतीसाठी महत्त्वाचे असलेले हे संकुल काही असामाजिक तत्वांमुळे अस्वच्छ व असुरक्षित बनत आहे. त्यामुळे खेळाडू आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

रात्रीच्या वेळी दारूडे मद्यपान करून बाटल्या फोडतात आणि कचरा टाकुन जातात यामुळे परिसराची पवित्रता व सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यामुळे पहाटे येणाऱ्या खेळाडूंना सरावाआधी स्वच्छता करावी लागते, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. सदर क्रीडा संकुल गावाबाहेर आणि निर्जन स्थळी आहे. भविष्यात मद्यधुंद अवस्थेत दारूड्यांमध्ये टोकाचा वाद किंवा अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वी असे लहान मोठे प्रकार येथे झाले आहेत.

त्यामुळे पोलीस प्रशासनाने रात्रीच्या वेळी नियमित गस्त घालून कारवाई करावी, अशी मागणी खेळाडू आणि व्यायामपटूंनी केली आहे. वेळीच कठोर उपाययोजना न केल्यास हे क्रीडा संकुल कायमचे दारुड्यांचे अड्डे बणण्याची भीती व्यक्त होत असून संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# श्री गिरुवाजी पार्श्वनाथ जैन मंदिराचा ७५ वा वर्धापन दिवस

## हीरक महोत्सवी सोहळ्यानिमित्त विविध पूजाविधी, मिरवणुका आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील सराफ बाजारातील श्री गिरुवाजी पार्श्वनाथ जैन मंदिराच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य आणि भक्तिमय अशा आठ दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या हीरक महोत्सवी सोहळ्यानिमित्त विविध पूजाविधी, मिरवणुका आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.या सोहळ्यानिमित्ताने रविवार, दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता परमात्मा व ध्वजा मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ६.३० वाजता मनमोहक महापूजेचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी श्री सत्तरभेदी पूजेचा कार्यक्रम होणार असून सकाळी १० वाजता ध्वजारोहण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र देशोद्धारक व्याख्यान वाचस्पती प.पू. आचार्यदेव श्रीमद विजय रामचंद्रसुरीश्वरजी महाराजा यांच्या आशीर्वादाने आणि प.पू. मुनीश्री हितरक्षितविजयजी म.सा.,प.पू. मुनीश्री विनयरक्षित विजयजी म.सा. तसेच प.पू. मुनीश्री हिरण्ययशविजयजी म.सा. यांच्या पावन सानिध्यात हे सर्व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

या निमित्ताने सुमारे १५० वर्षे प्राचीन श्री श्यामळिया पार्श्वनाथ भगवान तसेच अचिंत्य चिंतामणी आणि ५०० वर्षे प्राचीन, प्रगट प्रभावी श्री गिरुवाजी पार्श्वनाथ भगवान यांच्या दर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. या महोत्सवादरम्यान पहाटेची भक्ती गीते, पूज्य गुरू भगवंतांचे प्रवचन रात्री विशिष्ट देवाची सजावट पूजनामध्ये फळ आणि नैवेद्यांची मांडणी तसेच महाप्रसाद व सहभोजनाचा लाभ देण्यात येणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहून दर्शन व गुरुमहाराजांचा आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन श्री गिरुवाजी पार्श्वनाथ श्वेतांबर मूर्तिपूजक तपागच्छ जैन संघ संस्थान, सराफ बाजार, अमळनेर यांनी केले आहे.



(छायाचित्र : नितेश बारी)

## संपादकीय

### तापलेली धरणी आणि निसर्गाचा इशारा

एप्रिल महिना अर्धाही सरला नाही, तोच निसर्गाने आपले रौद्र रूप दाखवायला सुरुवात केली आहे. खान्देशाच्या मातीत यंदा सूर्याने जणू आग ओकायला सुरुवात केली असून, अमळनेर तालुक्यासह संपूर्ण परिसरात तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार गेला आहे. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत आहेत आणि अंगाची लाहीलाही होत आहे. पण हे केवळ 'उन्हाळा तीव्र झालाय' म्हणून सोडून देण्यासारखे नाही. वाढता पारा आणि सोबतीला असलेले अवकाळी पावसाचे सावट, हा प्रत्यक्षात निसर्गाने मानवाला दिलेला शेवटचा धोक्याचा इशारा आहे. आपण ज्याला 'ग्लोबल वॉर्मिंग' म्हणतो, त्याचे चटके आता आपल्या घराच्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहोचले आहेत.याच भीषण पार्श्वभूमीवर, अमळनेर तालुक्यात अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्थेच्या माध्यमातून 'भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियान' राबवले जात आहे. तालुक्यातील १५६ गावांमध्ये फिरणारा हा जनजागर रथ केवळ शेती सुधारण्यासाठी नाही, तर ही 'पर्यावरण वाचवण्याची' एक मोठी लोकचळवळ आहे.

योगायोगाने, आज १७ एप्रिल रोजी जगभरात 'आंतरराष्ट्रीय वटवाघुळ दिन' देखील साजरा होत आहे. जमिनीचे सुपोषण आणि वटवाघळांसारख्या उपेक्षित जीवांचे जतन, या दोन्ही गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्या म्हणजे विस्कटलेले निसर्गचक्र पुन्हा सांधणे!आज आपण कडक उन्हात होरपळत आहोत, याचे मुख्य कारण म्हणजे आपण जमिनीचा केलेला छळ. रासायनिक खतांच्या आणि जहाल कीटकनाशकांच्या बेसुमार वापरामुळे आपण जमिनीतील 'सेंद्रिय कर्ब' अक्षरशः संपवून टाकला आहे. पूर्वीची जमीन मऊ, सजीव आणि ओलावा टिकवून ठेवणारी होती. आज ती सिमेंटसारखी कडक आणि निर्जीव झाली आहे. सेंद्रिय घटक संपल्यामुळे जमीन सूर्याची उष्णता शोषून घेते आणि ती पुन्हा वातावरणात उत्सर्जित करते, ज्यामुळे स्थानिक तापमानात प्रचंड वाढ होत आहे. ज्या जमिनीला आपण 'माता' म्हणतो, तिला आपण रसायनांचे विष पाजून 'कुपोषित' करून टाकले आहे. भूमी सुपोषण अभियानाचा मूळ गाभा हाच आहे की, या धरतीला पुन्हा एकदा जैविक खते, गोपालन आणि पारंपरिक शेतीची जोड देऊन तिची प्रकृती सुधारावी.तापमानवाढीचा दुसरा भयानक परिणाम म्हणजे 'हवामान बदल'. एप्रिलमध्ये कडाक्याचे ऊन असताना अचानक ढग दाटून येतात आणि अवकाळी पाऊस पडतो. हा पाऊस शेतकऱ्यांच्या कष्टावर आणि खळ्यातील धान्यावर पाणी फेरतो. हे निसर्गचक्र का बिघडले? याचे उत्तर आपल्या जीवनशैलीत आहे. आपण निसर्गातील अन्नसाखळी तोडून टाकली आहे. आज आपण 'आंतरराष्ट्रीय वटवाघुळ दिन' साजरा करत असताना हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे की, वटवाघुळ हा प्राणी शेतकऱ्याचा निसर्गादत्त 'सुरक्षा रक्षक' आहे. एका रात्रीत हजारो कीटक खाऊन पिकांचे रक्षण करणारा हा जीव जर नष्ट झाला, तर कीटकनाशकांचा वापर अधिक वाढतो आणि पर्यायाने जमिनीचे प्रदूषणही वाढते. निसर्गातील प्रत्येक घटक मग ती जमिनीतील सूक्ष्मजीव असोत वा रात्रीच्या अंधारात उडणारे वटवाघुळ हे एकमेकांवर अवलंबून आहेत. ग्लोबल वॉर्मिंग हा आता केवळ विज्ञानातील शब्द राहिलेला नाही, तर तो आपल्या अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. वाढत्या उष्णतेमुळे जमिनीतील पाणी आटत आहे, विहिरी तळ गाठत आहेत आणि पिके करपून जात आहेत. अशा वेळी 'भूमी सुपोषण' ही काळाची गरज बनली आहे.

सुपोषित जमिनीमध्ये पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असते, त्यामुळे वाढत्या तापमानातही पिके तग धरू शकतात. सेंद्रिय शेती केवळ अन्नाचा दर्जा सुधारत नाही, तर ती पर्यावरणाचे तापमान कमी करण्यासही मदत करते.आता वेळ आली आहे ती प्रत्यक्ष कृती करण्याची. केवळ वातानुकूलित खोल्यांमध्ये बसून जागतिक तापमान वाढीवर चिंता व्यक्त करून भागणार नाही. अमळनेरच्या गावागावांत जो भूमी सुपोषणाचा जागर सुरू झाला आहे, त्यात प्रत्येक शेतकऱ्याने, प्रत्येक नागरिकाने आपला सहभाग नोंदवला पाहिजे. रासायनिक शेतीचा मोह टाळून नैसर्गिक शेतीकडे वळणे, हा आता केवळ एक पर्याय राहिलेला नाही, तर तो अनिवार्य मार्ग आहे. आपल्या पूर्वजांनी पिढ्यानपिढ्या ज्या मातीचे रक्षण केले, ती माती आज आपल्या डोळ्यादेखत वाळवंट होत चालली आहे. ती वाचवणे हीच खरी 'देशभक्ती' ठरेल. ४० अंशांचा हा पारा आणि अवकाळी पावसाची टांगती तलवार आपल्याला ओरडून सांगत आहे की, निसर्गाची सहनशक्ती आता संपत आली आहे. जर आपल्याला येणाऱ्या पिढीला सुदृढ आयुष्य, शुद्ध हवा आणि जगण्यायोग्य पृथ्वी द्यायची असेल, तर आपल्याला पुन्हा एकदा निसर्गाच्या नियमांचे पालन करावे लागेल. जमिनीला सुपोषित करणे, झाडे लावणे आणि वटवाघळांसारख्या निसर्गदत्त मित्रांचे संरक्षण करणे, हाच या संकटावरचा एकमेव शाश्वत उपाय आहे. चला, अमळनेरच्या या भूमी सुपोषण अभियानात सहभागी होऊया आणि आपल्या धरतीमातेला पुन्हा एकदा थंड, हिरवीगार आणि समृद्ध करण्याचा संकल्प करूया!

### अमळनेरला आगीचा विळखा...

# ढेकू तांडा येथे पिके जळून खाक

## २२ बिघे क्षेत्रातील मका, बाजरी, गहू आणि हरभरा या पिकांचा समावेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर शहर व तालुक्यात आगीच्या घटनांमध्ये हल्ली सातत्याने वाढ होत आहे. सर्वत्र आगीचे तांडव सुरूच आहे. दि. १५ रोजी दुपारी ढेकू तांडा येथे लागलेल्या भीषण आगीत सुमारे २२ बिघे क्षेत्रातील मका, बाजरी, गहू आणि हरभरा ही पिके जळून खाक झाली. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास ढेकू तांडा येथील शेतात अचानक आग लागली. जोरदार वाऱ्यामुळे आगीने अल्पावधितच रौद्ररूप धारण करून २२ बिघे क्षेत्र जाळून खाक केले. त्यामुळे शेतातील उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आगीचे लोण जवळील तांड्यापर्यंत पसरण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, ग्रामस्थांनी तत्काळ धाव घेत आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान, अमळनेर नगरपालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी वेळेवर दाखल झाल्याने आग आटोक्यात आली आणि मोठा अनर्थ टळला. या कार्यात अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी यांच्यासह कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, जफर पठाण आणि आकाश संदानशिव यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या तत्परतेबद्दल ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत. सतत वाढणाऱ्या आगीच्या घटनांमुळे नागरिकांनी व शेतकऱ्यांनी विशेष खबरदारी घेण्याचे बीडी सिगारेट उघड्यावर न फेकण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले आहे. दि. १४ एप्रिल रोजी अग्निशमन दिनाच्या दिवशीही आगीच्या दोन घटना घडल्या. दुपारी २ वाजेच्या सुमारास वर्णेश्वर मंदिराजवळ शॉर्टसर्किटमुळे झाडांना आग लागली. तसेच ग्रामीण भागातील आर्डी येथे राहुल पाटील यांच्या शेतातील चाऱ्यास आग लागली. या दोन्ही ठिकाणी अग्निशमन दलाने तात्काळ धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले आणि संभाव्य अनर्थ टाळला.या कारवाईत अग्निशमन अधिकारी गणेश गोसावी यांच्यासह दिनेश बिऱ्हाडे, फारुक शेख, जफर पठाण, आनंदा झिम्बल, आकाश संदानशिव, लखन कंखरे आणि वसीम पठाण यांनी परिश्रम घेतले.



ढेकू तांडा (ता.अमळनेर ): आग विझविण्यासाठी धावपळ करताना ग्रामस्थ



# 'लेकी'कडून जीवनदान मिळालेल्या 'बापा'ची एकनाथ शिंदेंनी घेतली भेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पुरंदर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना शिंदे गटाचे आमदार विजय बापू शिवतारे यांच्यावर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली.डॉ.ममता शिवतारे यांनी जन्मदाते वडील विजय शिवतारे यांना आपली किडनी दान करून त्यांना जीवनदान दिले.अंगावर कीट आणि तोंडावर मास्क घालत एकनाथ शिंदे हिरानंदानी रुग्णालयात पोहोचले.विजय शिवतारे यांची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली.लवकरच विजय शिवतारे यांनी पूर्ण बरे होऊन पुन्हा एकदा त्याच जोमाने जनसेवेसाठी सज्ज व्हावे अशा शुभेच्छा एकनाथ शिंदेंनी यावेळी दिल्या.गेल्या काही वर्षांपासून शिवतारे यांना किडनीविकाराचा त्रास होता. त्यामुळे त्यांना डायलिसिसद्वारे उपचार देण्यात येत होते. त्यामुळे विजय शिवतारेंवर शस्त्रक्रिया करण्यात आली.शस्त्रक्रियेनंतर विजय शिवतारे आणि ममता शिवतारे या दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. ममता या आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांच्या पत्नी आहेत.



अमळनेर : विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्यावतीने निवेदन देताना पदाधिकारी व कार्यकर्ते.

# मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर

## बजरंग दलाचे पोलीस प्रशासन व नगरपरिषदेला निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मोकाट जनावरांचा सुळसुळाट आणि वाढत्या जनावरे चोरीच्या घटनांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विश्व हिंदू परिषद बजरंग दल च्या वतीने पोलीस निरीक्षक आणि मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर मोकाट गायी वासरांना जन्म देत असून, या लहान वासरांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ले होत आहेत. गेल्या आठवडाभरात अशा घटनांमध्ये ५ वासरांचा मृत्यू झाला असून, ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याचा संताप निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे. तसेच जनावरे चोरीच्या वाढत्या घटनांमुळे पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. प्रशासनाला दिलेल्या या निवेदनावर बजरंग दलाचे संजय शहा (प्रखंड अध्यक्ष), सचिन चौधरी (प्रखंड मंत्री), सचिन महाजन (प्रखंड संयोजक), नरेश शामराव पाटील, नरेश आहुजा, योगराज चव्हाण, पवन बुरी, विजय गंभीर वारी, अमोल उत्तम महाजन, विजय धनराज पाटील, सागर वारी, परेश उदेवाल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**प्रमुख मागण्या :**

मोकाट जनावरांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी. जनावरे चोरीच्या प्रकरणांचा सखोल तपास करून दोषींना अटक करावी. जनावरांच्या मालकांना ४ दिवसांत जनावरे गोठ्यात बांधण्यासाठी जाहीर नोटीस द्यावी. मुदतीनंतर रस्त्यावर दिसणारी जनावरे नगरपरिषदेने जप्त करून कोंडवाडा किंवा गोशाळेत जमा करावीत

# बोहरे प्रलंबित भुसंपादन व संपूर्ण पुनर्वसनाचा विषय मार्गी लावणार

## आमदार अनिलदादा पाटील : जिल्हाधिकारी कार्यालयात झाली बैठक



अमळनेर : जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयात बोहरे येथील प्रलंबित समस्यांसाठी झालेल्या बैठकीत बोलतांना आमदार अनिलदादा पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे व बोहरे येथील ग्रामस्थ.

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर:- आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या सूचनेनुसार बोहरे येथील पाडळसरे धरणाअंतर्गत अनेक वर्षांपासून प्रलंबित भुसंपादन व संपूर्ण पुनर्वसनाचा विषय मार्गी लावण्यासाठी जिल्हाधिकारी जळगाव यांच्या दालनात आमदार व बोहरे ग्रामस्थ यांची सर्व अधिकाऱ्यांसहित बैठक पार पडली.

बैठकीत जिल्हाधिकारी रोहन घुगे व अधिकारी वर्गासोबत बोहरे येथील प्रलंबित प्रश्नावर सविस्तर चर्चा झाली. बोहरे गावावर विशेष लक्ष देऊन भविष्यात होणाऱ्या तापी महामंडळ बैठकीत निर्णय घेण्याचे व प्रस्ताव पाठवण्याचे आदेश देण्यात आलेत. यामुळे बोहरे गावाचा दिर्घ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न सुटण्याची आशा पल्लवीत झाली आहे. सदर बैठकीनंतर उपस्थित सर्व ग्रामस्थ व शेतकरी यांनी आमदार अनिल पाटील यांचे आभार मानले. या बैठकीत तापी पाटबंधारेचे महाजन व य. म.कडलग सर्व महसूल अधिकारी व ग्रामस्थ अनिल अहिरराव , यशवंत पाटील, दीपक पाटील,सुभाष बागुल, हेमंतराव विंचूरकर, कैलास विंचूरकर, रतन धनगर, अशोक कोळी,दिलीप कोळी, सुधाम बागुल, मनोज रत्नपारखी,प्रमोद बागुल,जयेश बागुल, भूषण धनगर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# मारवडमध्ये जखमी तरुणीची फरफट, उपचाराअभावी माघारी फिरण्याची वेळ

## आपत्कालीन सेवांचा बोजवारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मारवड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मध्यरात्री उपचारासाठी आलेल्या जखमी तरुणीला कुलूपबंद दारामुळे परत जावे लागल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकारामुळे आरोग्य व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोट्यवधींचा निधी खर्च करून उभारण्यात आलेले केंद्र प्रत्यक्षात मात्र 'रामभरोसे' असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. खेडी येथील पोलीस पाटील यांच्या कन्येला दि.१५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घरात अचानक चक्कर येऊन ती खाली पडल्याने दुखापत झाली. गावात तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध नसल्याने कुटुंबीयांनी तिला तत्काळ मारवड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले. मात्र तेथे पोहोचल्यावर आरोग्य केंद्राला कुलूप असल्याचे दिसून आले. त्यामुळे तातडीच्या उपचारांपासून रुग्ण वंचित राहिली आणि कुटुंबीयांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला. मारवड प्राथमिक आरोग्य केंद्र हे परिसरातील अनेक गावांसाठी मुख्य आरोग्य सुविधा देणारे केंद्र मानले जाते. या केंद्राअंतर्गत चार उपकेंद्रे कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत मुख्य केंद्रातच रात्रपाळीत एकही वैद्यकीय अधिकारी किंवा कर्मचारी उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली. नव्याने उभारलेल्या या केंद्रावर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात मूलभूत सेवा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या घटनेनंतर खेडी येथील पोलीस पाटील, पती आणि ग्रामस्थांनी तिव्र संताप व्यक्त केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचीही मागणी केली आहे. दरम्यान संबंधित घटनेच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी यांच्याशी मोबाईल वरुन संपर्क साधन्याचा प्रयत्न केला असता तो होवू शकला नाही.




# सोन्याची सर्वात मोठी खाण सापडली

## मानवाच्या कल्पनेपलीकडे अफाट गोल्डचा साठा; समुद्राच्या खाली दडलेले गुपित पाहून सर्व चक्रावले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रशांत महासागराच्या खोल भागात वैज्ञानिकांना मोठ्या प्रमाणात सोने आढळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. केरम्यॅडॅक आर्क या न्यूझीलंडच्या उत्तरेला असलेल्या ज्वालामुखीय पट्ट्यात संशोधन करत असताना संशोधकांना ज्वालामुखीय काचेच्या नमुन्यांमध्ये अपेक्षेपेक्षा खूप जास्त प्रमाणात सोने सापडले. हे नमुने पृथ्वीच्या अतिशय खोल भागातून वर आलेल्या वितळलेल्या पदार्थातून तयार झालेले असल्यामुळे पृथ्वीच्या अंतर्गत प्रक्रियांविषयी महत्त्वाची माहिती मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



### जमिनीखाली सोने स्थिर राहत नाही

या संशोधनातून एक महत्त्वाचा निष्कर्ष समोर आला आहे की सोने जमिनीखाली स्थिर राहत नाही तर सतत हालचाल करत असते. पृथ्वीच्या खोल भागात सोने साधारणपणे सल्फाइड खनिजांमध्ये अडकलेले असते आणि बहुतेक वेळ ते तिथेच राहते. मात्र ज्या ठिकाणी पृथ्वीच्या प्लेट्स एकमेकांवर आदळतात आणि एक प्लेट दुसऱ्याखाली सरकते, त्या भागात परिस्थिती बदलते.

### सोने कसे बाहेर येते?

अशा ठिकाणी तापमान आणि दाब प्रचंड वाढतो. परिणामी खडक वितळू लागतात आणि खनिजे तुटू लागतात. यामुळे सोने मुक्त होऊन वितळलेल्या खडकात मिसळते. ही वितळलेली खडकसदृश वस्तू हळूहळू वरच्या दिशेने सरकते. ही प्रक्रिया वारंवार घडत राहिल्यामुळे काही विशिष्ट ठिकाणी विशेषतः ज्वालामुखीय प्रदेशांच्या आसपास सोने साचू लागते.

### 'सोने तयार करणारा कारखाना'

याच कारणामुळे या प्रक्रियेला सोने तयार करणारा कारखाना असे म्हटले जात आहे. प्रत्यक्षात येथे सोने तयार होत नाही, तर नैसर्गिक चक्रांमुळे ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवले जाऊन साठवले जाते. विशेष म्हणजे ही प्रक्रिया सतत सुरू असल्याचे दिसून आले आहे. वैज्ञानिकांनी विविध नमुन्यांचे विश्लेषण केले असता प्रत्येक वेळी सामान्यपेक्षा अधिक सोने आढळले. त्यामुळे ही एकदाच घडणारी घटना नसून सातत्याने चालणारी मोठी नैसर्गिक प्रक्रिया असल्याचे स्पष्ट झाले.

### खजिना सहज मिळणार नाही

मात्र याचा अर्थ असा नाही की येथे सहजपणे सोने मिळू शकते. ही संपूर्ण प्रक्रिया समुद्राच्या खूप खोल भागात घडते, जिथे पोहोचणे अत्यंत कठीण आहे. जरी सोने साचत असले तरी ते ज्वालामुखीय प्रणाली किंवा समुद्रतळाच्या आतच अडकून राहते. या शोधामुळे सोने कसे आणि कुठून तयार होते याविषयीची आपली समज बदलत आहे. आता सोने हे अनियमितपणे विखुरलेले नसून पृथ्वीच्या प्लेट्सची हालचाल, वितळलेल्या खडकांचा प्रवाह आणि लाखो वर्षांमध्ये घडणाऱ्या भूगर्भीय प्रक्रियांचा एक भाग असल्याचे स्पष्ट होत आहे.

# सोने, चांदीत सलग तिसऱ्या दिवशी तेजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी आणि अमेरिका-इराण चर्चेच्या शक्यतेमुळे सोन्याने १.५८ लाखांचा टप्पा ओलांडला असून, चांदी प्रति किलो २.६३ लाखांवर पोहोचली आहे. लग्नसराईच्या काळात वाढलेल्या या दरांमुळे ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, गुंतवणुकीसाठी मात्र तेजीचे संकेत मिळत आहेत. सुवर्ण बाजारपेठेत सलग तिसऱ्या दिवशी गुरुवारी सोने, चांदीच्या दरात वाढ नोंदवली गेली. दोन्ही धातुंच्या दरात वाढ झाल्यानंतर सणासुदीसह लग्नसराईसाठी दागिने खरेदीच्या विचारात असलेल्या ग्राहकांनी तर डोक्यालाच हात लावला. जागतिक घडामोडींमुळे सोन्या-चांदीच्या बाजारात पुन्हा तेजीचे संकेत दिसू लागल्याने सुवर्ण व्यावसायिकांचीही अस्वस्थता वाढली.अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य चर्चेच्या दुसऱ्या फेरीची शक्यता निर्माण झाल्याने गुंतवणूकदारांचा कल सुरक्षित गुंतवणुकीकडे वळताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय बाजारात मौल्यवान धातुंच्या दरात वाढ झाली असून, त्याचा थेट परिणाम देशांतर्गत बाजारावरही जाणवत आहे. गुरुवारी सकाळच्या सत्रात कॉमेक्स या आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या दरात लक्षणीय वाढ नोंदवली गेली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# चिकाटीचा ‘विजय’...! ३५ परीक्षांमध्ये अपयशी, आधी आयपीएस आणि नंतर झाले आयएएस

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हरियाणाच्या सिरसा जिल्ह्याचा सुपुत्र असलेल्या विजय वर्धन यांनी सरकारी नोकऱ्यांसाठी ३५ पेक्षाही अधिक स्पर्धा परीक्षा दिल्या होत्या. मात्र प्रत्येक वेळी ते अपयशी ठरले होते. तथापी त्यांनी जिद्द कायम राखत चक्क दोनदा युपीएससी परिक्षेत यश मिळविले त्यातही ते आयपीएस झाले. नंतर आयएएस झाले. पण त्याची जिद्द कायम होती, आणि ते प्रयत्न करत राहिले. दृढनिश्चयाने त्यांनी दोनदा यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली, आणि आधी आयपीएस व नंतर आयएएस बनले. काही लोक आयुष्यात कधीही सोपा मार्ग स्वीकारत नाहीत. त्याउलट त्यांना खडतर मार्गाने अपयशांवर मात करून उद्दिष्ट साध्य करत पुढे जाण्याचा निर्धार करतात. हरियाणाचा सुपुत्र असलेल्या विजयने वारंवार येणाऱ्या अपयशांमुळे खचून न जाता, विजय यांची यशोगाथा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना हे दाखवून देते की, अपयशांना न जुमानता पुढे जाण्याच्या धैर्यातच खरा ‘विजय’ दडलेला आहे.



विजय हे सामान्य कुटुंबात जन्मले मात्र त्यांनी नेहमीच मोठी स्वप्ने पाहिली. विजय यांच्या कुटूंबातील सदस्यांनी त्यांच्या अपयशात देखील सतत पाठींबा देत त्यांना प्रोत्साहित केले. त्यांचे मित्र, नातेवाईक यांचा देखील सतत त्यांचा बद्दल सहकार्य आणि प्रोत्साहन त्यांना मिळत राहिले त्यामुळे अपयशात देखील ते स्थितप्रज्ञ राहून अभ्यासात चिकाटी ठेऊ शकले. परिस्थितीशी संघर्ष करत विजय यांनी त्यांच्या ध्येयाचा कधीही विसर पडू दिला नाही. हाच विचार त्याच्या संघर्षाचा व यशाचा भक्कम पाया बनला. विजय यांनी दिल्लीत इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले होते. तेथेच त्यांनी सरकारी नोकरीचे स्वप्न पाहिले होते. विजय यांना अपेक्षित असलेले यश मिळविण्यासाठी दिवसामागून दिवस पार होत होते. मात्र कोणत्याही स्थितीतील आरपारची लढाई लढण्यात विजय यांनी जरा देखील संयम ढळू दिला नाही. परिश्रमाशी तडजोड केली नाही. अपेक्षीत यश प्राप्तीसाठी विजय यांनी ३५ प्रकारच्या विविध स्पर्धा परिक्षा दिल्या मात्र ते प्रत्येक वेळेस अपयशी ठरले. विजय हे २०१८ मध्ये पहिल्यांदा यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण झाले. राष्ट्रीय पातळीवर त्यांनी १०४ वा क्रमांक मिळवला. यामुळे त्यांना आयपीएस अधिकारी होता आले. मात्र विजय यांना आयएएस व्हायचे होते म्हणून त्यांनी कठोर परिश्रम करून युपीएससी ची परिक्षा दिली. यावेळी मात्र अर्थात २०२१ मध्ये ते आयएएस अधिकारी झाले. विजय यांचा प्रवास हे दाखवून देतो की यश केवळ प्रतिभेने मिळत नाही, तर संयम, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाने मिळते. अपयशाला घाबरणाऱ्या आणि सहज हार मानणाऱ्या प्रत्येकासाठी विजय यांची संघर्ष कथा प्रेरणादायी आहे.

# शंभूराजांच्या ताईसाहेब राणूअक्कांचा ३५० वर्षांपूर्वीचा वाडा पाहिला का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



शंभूराजांच्या ताईसाहेब राणूअक्का यांचा वाडा मराठा साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देत आजही उभा आहे.

**वारसा**

सुमारे ३०० ते ३५० वर्षे जुना असलेला हा वाडा त्या काळातील सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरेचे प्रतीक मानला जातो.

**ओळख**

राणू अक्का या छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांच्या द्वितीय कन्या होत्या.

**नाते**

त्या छत्रपती संभाजी महाराजांच्या सख्ख्या मोठ्या बहीण होत्या आणि त्यांच्यावर अपार प्रेम करत होत्या.

**माया**

आई सईबाईंच्या निधनानंतर त्यांनी संभाजी महाराजांची आईसारखी काळजी घेतली आणि त्यांना आधार दिला.

**विवाह**

१६६० मध्ये त्यांचा विवाह अचलोजी जाधवराव यांच्याशी मोठ्या थाटामाटात पार पडला.

**घराणे**

जाधवराव हे सिंदखेडच्या लखूजी जाधवरावांच्या वंशातील प्रतिष्ठित घराणे होते.

**नातेसंबंध**

या विवाहामुळे शिवरायांनी आपल्या आजोळाशी घटना इतिहासातील उल्लेखानुसार कठीण काळात राणू अक्कांनी संभाजी महाराजांना खंबीर साथ दिली.

**स्मृती**

आजही हा वाडा राणू अक्कांच्या त्याग, प्रेम आणि समर्पणाच्या स्मृती जीवंत ठेवतो.

**स्थळ**

हा ऐतिहासिक वाडा सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील भुईंज गावात आहे.पुन्हा स्नेहबंध दृढ केले.

**वास्तव्य**

लग्नानंतर राणू अक्का भुईंज येथील जाधवरावांच्या वाड्यात वास्तव्यास होत्या.

**रचना**

दगडी बांधकाम आणि पारंपारिक मराठी वाडा शैली यामुळे हा वाडा विशेष आकर्षक दिसतो.

**परंपरा**

हा वाडा मराठी वाडा संस्कृतीचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखला जातो.

**वंशज**

आजही जाधवराव कुटुंबाचे वंशज या वाड्यात राहून परंपरा जपताना दिसतात.

**जन्मदिन विशेष**

# ‘निसर्गदत्त महाराज’ अद्वैत तत्त्वज्ञानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निसर्गदत्त महाराज (१८९७-१९८१) हे आधुनिक काळातील एक थोर अद्वैत तत्त्वज्ञानी आणि संत होते. त्यांच्या `मी आहे` या ग्रंथामुळे त्यांचे विचार जगभरात पोहोचले. त्यांची शिकवण अत्यंत साधी, सरळ तरीही गहन होती.त्यांचे नाव मारुती मारुती शिवरामपंत कांबळी,त्यांचा जन्म १७ एप्रिल १८९७ (हनुमान जयंतीच्या दिवशी) ला झाला. मारुतींचे वडील शिवरामपंत हे मुंबईत घरकाम करायचे आणि नंतर ते रत्नागिरी जिल्ह्यातील कांदळगाव येथे शेतीसाठी स्थायिक झाले. मारुतींचे बालपण निसर्गाच्या सानिध्यात आणि शेतीकामात गेले. त्यांना लहानपणापासूनच अध्यात्मिक विषयांची ओढ होती.१९२४ मध्ये मारुती व्यवसायानिमित्त पुन्हा मुंबईत आले. तिथे त्यांनी छोट्या वस्तूंचे दुकान सुरू




केले. दरम्यान, त्यांचे मित्र यशवंतराव बागी यांनी त्यांची भेट सिद्धरामेश्वर महाराज यांच्याशी घडवून आणली. ही भेट मारुतींच्या आयुष्यातील सर्वात मोठे वळण ठरली.गुरूंच्या उपदेशावर त्यांनी पूर्ण श्रद्धा ठेवली. गुरूंनी त्यांना सांगितले होते: "तू फक्त तुझ्या `असण्यावर` लक्ष केंद्रित कर. तू शरीर किंवा मन नाहीस, तर तू शुद्ध `चैतन्य` आहेस."या एकाच वाक्याचे चिंतन करता करता त्यांना आत्मसाक्षात्कार झाला आणि मारुतीचे `निसर्गदत्त महाराज` झाले.निसर्गदत्त महाराजांचे तत्त्वज्ञान हे अद्वैत वेदांतावर आधारित होते. त्यांच्या शिकवणीचे काही मुख्य पैलू आहेत.ते नेहमी म्हणत की, आपण स्वतःला शरीर किंवा मन समजतो, हेच सर्व दुःखाचे मूळ आहे. आपण जे नाही आहोत (देह, विचार, भावना), त्याचा त्याग करणे म्हणजे सत्याचा शोध होय. जगातील सर्व ज्ञानाचे मूळ `मी आहे` या जाणीवेत आहे. या जाणीवेच्या पलीकडे जे आहे, तेच अंतिम सत्य किंवा `परब्रह्म` आहे.त्यांच्या मते, तासनतास ध्यान करण्यापेक्षा सतत जागरूक राहणे आणि आपल्या अस्तित्वाच्या मुळाशी राहणे हीच खरी साधना आहे.महाराज मुंबईतील खेतवाडीमधील एका छोट्या खोलीत राहत असत. तिथे ते लोकांशी संवाद साधत. मॉरिस फ्रिडमन यांनी महाराजांच्या संवादांचे संकलन करून `I Am That` या नावाने इंग्रजीत प्रसिद्ध केले. या पुस्तकामुळे पाश्चात्य जगातील अनेक विचारवंत आणि साधक त्यांच्याकडे आकर्षित झाले.निसर्गदत्त महाराज कोणत्याही बाह्य डामडौलाला महत्त्व देत नसत. ते अत्यंत साधेपणाने राहत आणि विडी ओढत उपदेश करत असत, जे त्यांच्या साधेपणाचे लक्षण मानले जाई. त्यांनी कधीही स्वतःचा मठ स्थापन केला नाही किंवा स्वतःला `गुरु` म्हणून मिरवले नाही. ८ सप्टेंबर १९८१ रोजी त्यांनी आपला देह त्यागला. आज जगभरातील हजारो लोक त्यांच्या `निसर्गदत्त संप्रदाय` आणि त्यांच्या साध्या पण प्रभावी तत्त्वज्ञानाचे अनुसरण करतात.निसर्गदत्त महाराज हे अशा संतांपैकी होते ज्यांनी सिद्ध केले की, संसारी राहूनही सर्वोच्च आध्यात्मिक उंची गाठता येते. त्यांनी माणसाला स्वतःच्या आत डोकावण्याचा आणि "मी कोण आहे?" या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा मार्ग दाखवला.

# हिंदी कवी, थोर कृष्णभक्त ‘आचार्य संत सूरदास’

**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हिंदी साहित्यातील `भक्ती काळा`चे मेरुमणी आणि अष्टछाप कवींपैकी सर्वोच्च स्थान असलेले संत सूरदास हे एक महान कृष्णभक्त, कवी आणि संगीतकार होते. त्यांच्या काव्यरचनेतून वात्सल्य रस आणि भक्ती रसाचा जो ओघ वाहिला, त्यानी हिंदी साहित्याला समृद्ध केले.संत सूरदासांच्या जन्माबाबत विद्वानांमध्ये दोन मतप्रवाह आहेत. काही विद्वानांच्या मते त्यांचा जन्म दिल्लीजवळील सीही गावात झाला, तर काही मते आग्रा-मथुरा मार्गावरील रुनकता (रेणुका क्षेत्र) हे त्यांचे जन्मस्थान मानतात.असे मानले जाते की सूरदास हे जन्मांध होते. मात्र, त्यांच्या काव्यातील श्रीकृष्णाच्या बाललीलांचे इतके जिवंत आणि सूक्ष्म वर्णन पाहून अनेकजण थक्क होतात. त्यांनी केवळ डोळ्यांनी नव्हे, तर अंतर्मनाने भक्तीचा साक्षात्कार घडवला होता.सुरुवातीच्या काळात सूरदास आग्र्यावळील `गऊघाट` येथे राहून दीनतेची पदे गात असत. तिथेच त्यांची भेट पुष्टीमार्गाचे प्रवर्तक महाप्रभू वल्लभाचार्य यांच्याशी झाली. वल्लभाचार्यांनी त्यांना `दीनता` सोडून भगवंताच्या `लीलांचे` गान करण्याचा सल्ला दिला. "सूर ह्वै के ऐसो घिघियात काहे को है, कछु भगवद्-लीला वर्णन करि।"त्यानंतर सूरदास वल्लभाचार्यांचे शिष्य बनले आणि त्यांनी आयुष्यभर गोवर्धन पर्वतावरील श्रीनाथजींच्या मंदिरात कीर्तन-भक्तीद्वारे श्रीकृष्णाची सेवा केली.सूरदासांनी सव्वा लाख पदांची रचना केली होती असे म्हटले जाते, ज्यापैकी सध्या काही हजार पदे उपलब्ध आहेत. त्यांची प्रमुख ग्रंथसंपदा सूरसागरः हा त्यांचा सर्वात महत्त्वाचा आणि लोकप्रिय ग्रंथ आहे. यात श्रीकृष्णाच्या बाललीला आणि भ्रमरगीताचे अप्रतिम वर्णन आहे.सूरसारावलीः हा ग्रंथ सूरसागरचा सारांश मानला जातो.साहित्य लहरीः यात दृष्टिकूट पदांचा संग्रह असून साहित्याच्या दृष्टीने याला महत्त्व आहे.सूरदास हे केवळ कवी नव्हते तर ते एक उत्तम संगीतकारही होते. ते विविध रागांमध्ये स्वतःची पदे बांधून गात असत. त्यांनी `अष्टछाप` कवींमध्ये प्रमुख स्थान मिळवले. त्यांच्या काव्यातील वात्सल्य रस इतका प्रभावी आहे की, त्यांना `वात्सल्य रसाचा सम्राट` म्हटले जाते. यशोदा माता आणि बालकृष्ण यांच्यातील नाते त्यांनी ज्या हळुवारपणे मांडले, त्याला तोड नाही.संत सूरदास यांनी आपल्या भक्तीने आणि काव्याने समाजाला ईश्वराच्या सगुण रूपाची ओळख करून दिली. "डोळे नसतानाही ज्याला ईश्वराचे रूप दिसले", अशा या महान संताने इ.स. १५८३ च्या सुमारास पारसोली येथे आपला देह ठेवला. आजही त्यांच्या `सूरसागर` मधील पदे भक्तांच्या आणि संगीतप्रेमींच्या ओठावर जिवंत आहेत.

# भारताचे दुसरे राष्ट्रपती, थोर तत्त्वज्ञ व आदर्श शिक्षक ‘डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन’

**स्मृतिदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१८८८-१९७५) हे स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती, थोर तत्त्वज्ञ, प्रकांड पंडित आणि एक आदर्श शिक्षक होते. भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान यांचा सुवर्णमध्य साधणारे ते एक जागतिक कीर्तीचे विचारवंत होते.डॉ. राधाकृष्णन यांची खरी ओळख ही एक `शिक्षक` म्हणून होती. त्यांनी म्हैसूर विद्यापीठ आणि कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. पुढे ते ऑक्सफर्ड विद्यापीठात `पौर्वात्य धर्म आणि नैतिकता` या विषयाचे प्राध्यापक झाले, ही एका भारतीयासाठी अत्यंत सन्मानाची गोष्ट होती.भारतीय तत्त्वज्ञान जगासमोर मांडण्याचे मोठे काम त्यांनी केले. त्यांचे `इंडियन फिलॉसॉफी` हे दोन खंड आजही तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक मानले जातात.त्यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी तिरुत्तनी (तामिळनाडू) येथे झाला.त्यांचे प्राथमिक शिक्षण तिरुत्तनी येथे झाले, तर उच्च शिक्षण मद्रास ख्रिश्चन कॉलेजमध्ये झाले. त्यांनी तत्त्वज्ञान विषयात एम.ए. पदवी संपादन केली. डॉ. राधाकृष्णन यांची खरी ओळख ही एक `शिक्षक` म्हणून होती. त्यांनी म्हैसूर विद्यापीठ आणि कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. पुढे ते ऑक्सफर्ड विद्यापीठात `पौर्वात्य धर्म आणि नैतिकता` या विषयाचे प्राध्यापक झाले, ही एका भारतीयासाठी अत्यंत सन्मानाची गोष्ट होती.भारतीय तत्त्वज्ञान जगासमोर मांडण्याचे मोठे काम त्यांनी केले. त्यांचे `इंडियन फिलॉसॉफी` हे दोन खंड आजही तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक मानले जातात.स्वातंत्र्यानंतर डॉ. राधाकृष्णन यांनी देशाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी युनेस्कोमध्ये भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. १९४९ मध्ये त्यांची सोव्हिएत युनियनमध्ये भारताचे राजदूत म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या विद्वत्तेमुळे जोसेफ स्टॅलिन देखील प्रभावित झाले होते.१९५२ मध्ये ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले.१९६२ मध्ये त्यांची भारताचे दुसरे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. त्यांच्या कार्यकाळात भारताने चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५) या दोन युद्धांचा सामना केला होता. डॉ. राधाकृष्णन जेव्हा राष्ट्रपती झाले, तेव्हा त्यांच्या काही शिष्यांनी आणि मित्रांनी त्यांचा वाढदिवस साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावर राधाकृष्णन म्हणाले "माझा वाढदिवस साजरा करण्याऐवजी, ५ सप्टेंबर हा दिवस `शिक्षक दिन` म्हणून साजरा केला गेला, तर मला त्याचा अधिक अभिमान वाटेल."त्यांच्या या इच्छेखातर १९६२ पासून दरवर्षी ५ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण भारतात `शिक्षक दिन` म्हणून साजरा केला जातो.१९५४ मध्ये भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान `भारतरत्न` देऊन त्यांना गौरविण्यात आले.१९३१ मध्ये ब्रिटीश सरकारने त्यांना `सर` ही पदवी बहाल केली होती.तसेच १९७५ मध्ये त्यांना प्रतिष्ठेचा टेम्पलटन पुरस्कारही मिळाला होता.डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगाला हे दाखवून दिले की, एक `दार्शनिक` किंवा `शिक्षक` देखील देशाचे यशस्वी नेतृत्व करू शकतो. १७ एप्रिल १९७५ रोजी त्यांचे निधन झाले. "शिक्षणाने माणूस केवळ साक्षर होऊ नये, तर तो सुसंस्कृत झाला पाहिजे," हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे.



शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम


सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# मंत्रांचे ऊर्जा-संकेत : ध्वनीविज्ञानातील गुढ रहस्ये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय मंत्र परंपरेत केवळ बीज मंत्रच नाही, तर मंत्रांच्या शेवटी किंवा मध्ये येणारे 'ॐ', 'फट्', 'स्वाहा' आणि 'नमः' हे शब्दही तितकेच तांत्रिक आणि आध्यात्मिक महत्त्व राखून आहेत. हे केवळ उच्चार नसून ते मंत्राची दिशा, वेग आणि कार्याचा प्रकार ठरवणारे ऊर्जा चावी आहेत.. मंत्राच्या प्रारंभी येणारा 'ॐ' हा विश्वाचा मूळ नाद आणि 'प्रणव' मानला जातो, जो साधकाच्या चित्ताला ब्रह्मांडाच्या वैश्विक ऊर्जेशी जोडणारा एक डिजिटल कोड आहे, जो मंत्राला जागृत करून मनातील कोलाहल शांत करतो. जेव्हा मंत्राच्या शेवटी 'नमः' (न-मम) जोडले जाते, तेव्हा ते पूर्ण शरणागतीचे आणि अहंकाराच्या विसर्जनाचे प्रतीक असते. याची प्रकृती चंदनासारखी शीतल असल्याने, हे प्रामुख्याने आत्मिक प्रगती, मानसिक शांती आणि भक्तीच्या मार्गावर चालणाऱ्या साधकांसाठी एक कवच म्हणून कार्य करते. याउलट, 'स्वाहा' हा शब्द अग्नीच्या जाज्वल्य शक्तीशी संबंधित आहे, जेव्हा एखादी इच्छा पूर्ण करायची असते किंवा यज्ञाद्वारे आपल्या संकल्पाची आहुती निसर्गातील दिव्य शक्तींना द्यायची असते, तेव्हा 'स्वाहा' मंत्रातील ऊर्जेला गती देऊन ती अभीष्ट ध्येयापर्यंत पोहोचवण्याचे माध्यम बनते.अघोरी आणि नाथ परंपरेत सर्वात रहस्यमय आणि शक्तिशाली मानला जाणारा शब्द म्हणजे 'फट्' हे एक अमोघ अस्त्र आहे. ज्याप्रमाणे वीज पडल्यावर सर्व अंधार आणि जडत्व नष्ट होते, त्याप्रमाणे 'फट्' हा ध्वनी नकारात्मक शक्तींचा विनाश करण्यासाठी, तंत्र-बाधा तोडण्यासाठी आणि साधकाच्या सभोवती अभेद्य संरक्षणात्मक वलय निर्माण करण्यासाठी एखाद्या वज्रप्रहारासारखा वापरला जातो. तर कधी कधी कधीकधी मंत्राच्या शेवटी केवळ एक शब्द न लावता 'फट्-स्वाहा' असे जोडले जाते. 'फट्' नकारात्मकता तोडतो आणि 'स्वाहा' त्या ऊर्जेला गती देतो. हा प्रयोग प्रामुख्याने 'शत्रू निवारण' आणि 'बाधा मुक्ती' एकाच वेळी करण्यासाठी केला जातो. हा मंत्राला अत्यंत आक्रमक पण यशस्वी बनवतो.थोडक्यात, साबर आणि तांत्रिक साधनेत या शब्दांचा वापर अत्यंत विचारपूर्वक केला जातो. म्हणूनच, कोणत्या मंत्राच्या मागे काय लावायचे, हे केवळ शब्दांचा खेळ नसून ती एक सूक्ष्म 'सायन्स ऑफ साऊंड' आहे. या ध्वनींच्या योग्य उच्चारामुळेच सामान्य शब्द 'मंत्र' बनतात आणि साधकाच्या सुप्त शक्तीला जागृत करतात. मंत्रशास्त्राच्या गुह्य शाखेत, विशेषतः शाक्त, तांत्रिक आणि नाथ परंपरेत, मंत्राची गती आणि परिणाम पूर्णपणे बदलणारे आणखी काही महत्त्वाचे शब्द (पल्लव) आहेत. हे शब्द मंत्राला विशिष्ट 'कमांड' देतात, ज्यामुळे मंत्राची शक्ती एका ठराविक कामासाठी वळवली जाते,. असे अजून काही गूढ शब्द आहेत, ते म्हणजे हुं, वैषट्, वौषट्, ठः ठः, जहि जहि, असे अनेक शब्द.........!!



# त्रिपुर सुंदरी श्रीविद्या की परम आद्या शक्ति

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



त्रिपुर सुंदरी, जिन्हें ललिता महात्रिपुरसुंदरी भी कहा जाता है, सम्पूर्ण सृष्टि की मूल चेतना और परम सौन्दर्य की अधिष्ठात्री देवी हैं। "त्रिपुर" का अर्थ है तीन लोक भूत, वर्तमान और भविष्य; जाग्रत, स्वप्न और सुषुप्ति; तथा स्थूल, सूक्ष्म और कारण इन तीनों अवस्थाओं पर जो शासन करती हैं, वही त्रिपुर सुंदरी हैं। वे केवल बाह्य सौन्दर्य की देवी नहीं, अपितु आत्मा की दिव्यता, चेतना की पराकाष्ठा और ब्रह्मविद्या की मूर्त स्वरूप हैं।उनका स्वरूप अत्यंत मोहक, कोमल और तेजस्वी होता है। वे रक्तवर्णा चारों आयुध साधक के मन, बुद्धि, चित्त और अहंकार पर नियंत्रण का प्रतीक हैं। उनका यह स्वरूप दर्शाता है कि वे न केवल सृष्टि की रचयिता हैं, बल्कि साधक को माया से मुक्त कर परम सत्य तक ले जाने वाली शक्ति भी हैं।त्रिपुर सुंदरी की उपासना का केंद्र है "श्रीचक्र", जिसे तंत्र में सबसे शक्तिशाली यंत्र माना गया है। श्रीचक्र नौ त्रिकोणों से निर्मित एक दिव्य ज्यामितीय संरचना है, जिसमें ऊपर की ओर संकेत करते त्रिकोण शिव का और नीचे की ओर संकेत करते त्रिकोण शक्ति का प्रतीक हैं। जब ये दोनों मिलते हैं, तब सम्पूर्ण ब्रह्मांड की सृष्टि होती है। श्रीचक्र के प्रत्येक आवरण में देवियों का वास होता है, और इसका केंद्र "बिंदु" स्वयं त्रिपुर सुंदरी का निवास है, जो सृष्टि का मूल बीज है।श्रीविद्या साधना में श्रीचक्र केवल एक आकृति नहीं, बल्कि सम्पूर्ण ब्रह्मांड का सूक्ष्म स्वरूप है। इसका ध्यान करने से साधक धीरे-धीरे बाह्य जगत से ऊपर उठकर आत्मा की गहराई में प्रवेश करता है और अंततः देवी के साथ एकत्व का अनुभव करता है। यही कारण है कि त्रिपुर सुंदरी को "श्रीविद्या की अधिष्ठात्री" कहा जाता है। एक श्लोक में देवी को कदंब वन में निवास करने वाली, कमल के समान नेत्रों वाली, और तीनों लोकों के स्वामी शिव की शक्ति के रूप में वंदित किया गया है।त्रिपुर सुंदरी की साधना साधक को भौतिक और आध्यात्मिक दोनों स्तरों पर उन्नति प्रदान करती है। वे केवल धन, सौभाग्य और सौन्दर्य ही नहीं देतीं, बल्कि आत्मज्ञान, शांति और मोक्ष का मार्ग भी प्रशस्त करती हैं। श्रीचक्र के माध्यम से उनकी उपासना करने वाला साधक धीरे-धीरे अपने भीतर की समस्त बाधाओं को पार कर परम आनंद की अवस्था को प्राप्त करता है।जब साधक श्रीचक्र के केंद्र बिंदु पर ध्यान करता है, तब वह अनुभव करता है कि वही बिंदु सम्पूर्ण ब्रह्मांड का मूल है और वही देवी का वास्तविक स्वरूप है। इस प्रकार त्रिपुर सुंदरी केवल एक देवी नहीं, अपितु सम्पूर्ण सृष्टि की चेतना, शक्ति और सौन्दर्य की परम अभिव्यक्ति हैं।

# भारतातील 'या' मंदिरात उंदरांचा उष्टा प्रसाद वाटप

## तब्बल हजारोंच्या संख्येत राहतात येथे उंदीर; पण चुकून पाय पडला तर...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात अशी अनेक मंदिरे आहेत जी त्यांच्या रहस्यमयी इतिहासासाठी प्रसिद्ध आहेत. अशी रहस्य जी आजवर उलगडलेली नाहीत. जेथे सायन्सही फेल ठरते. पण भारतात अशीही काही मंदिरे आहेत जी त्यांच्या आगळ्यावेगळ्या गोष्टींसाठी प्रसिद्ध आहेत. भारताच्या राजस्थानमधील वाळवंटात वसलेले 'करणी माता मंदिर' हे जगातील सर्वांत आश्चर्यकारक आणि गूढ मंदिरांपैकी एक मानले जाते. बिकानेरपासून सुमारे ३० किलोमीटरवर असलेल्या 'देशनोक' येथे हे मंदिर असून, याला 'उंदरांचे मंदिर' म्हणूनही ओळखले जाते. या मंदिराचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे हजारो उंदीर मुक्तपणे वावरतात आणि भाविक त्यांना मोठ्या श्रद्धेने दूध आणि मिठाई अर्पण करतात. विशेष म्हणजे या उंदरांनी चाखलेला किंवा उष्टा केलेला प्रसाद भाविक अत्यंत आदराने ग्रहण करतात.

### २५ हजारांपेक्षा जास्त उंदीर, 'काबा'ची संकल्पना

करणी माता मंदिरात सुमारे २५ हजारांहून अधिक काळे उंदीर राहतात. स्थानिक भाषेत या उंदरांना 'काबा' म्हटले जाते. पौराणिक कथेनुसार हे उंदीर सामान्य प्राणी नसून ते करणी मातेचे वंशज आणि त्यांचे सेवक आहेत. असे मानले जाते की, या उंदरांच्या मृत्यूनंतर ते मानवी रूपात जन्म घेतात आणि



मानवाच्या मृत्यूनंतर ते पुन्हा 'काबा' म्हणून या मंदिरात येतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एवढ्या मोठ्या संख्येने उंदीर असूनही या परिसरात कधीही दुर्गंधी येत नाही किंवा आजपर्यंत येथे कोणत्याही प्रकारचा साथीचा रोग पसरलेला नाही.

### पांढऱ्या उंदराचे दर्शन आणि नवसपूर्ती

हजारो काळ्या उंदरांच्या गर्दीत या मंदिरात काही मोजके 'पांढरे उंदीर' देखील आहेत. या पांढऱ्या उंदरांचे दर्शन होणे हे अत्यंत भाग्याचे मानले जाते. जर एखाद्या भाविकाला पांढरा उंदीर दिसला, तर त्याचा अर्थ असा होतो की करणी मातेने त्याच्यावर विशेष कृपा केली आहे आणि त्याच्या सर्व मनोकामना पूर्ण होणार आहेत. मंदिरात चालताना भाविकांना अत्यंत सावधगिरी बाळगावी लागते; कारण चुकूनही एखाद्या उंदराचा पाय चिरडला गेला, तर तो अपशकुन मानला जातो आणि त्या बदल्यात सोन्याचा किंवा चांदीचा उंदीर मंदिरात दान करावा लागतो.

### उष्टा प्रसाद आणि अद्भुत श्रद्धा

या मंदिरातील सर्वात थक्क करणारी गोष्ट म्हणजे प्रसादाची पद्धत. मंदिराच्या मध्यभागी एका मोठ्या धातूच्या परातीत दूध ठेवले जाते, ज्यातून शेकडो उंदीर एकाच वेळी दूध पितात. उंदरांनी प्यायलेले हे उष्टे दूध नंतर भाविकांना 'प्रसाद' म्हणून वाटले जाते. जगभरातील लोक हे दूध मोठ्या आवडीने पितात आणि असे मानले जाते की, हा प्रसाद ग्रहण केल्याने असाध्य रोग बरे होतात.

## पुरीतील जगन्नाथजी...

# प्रभू श्रीरामांच्या भक्ताला साखळदंडात का बांधून ठेवले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेव्हा राजा इंद्रद्युम्नाने पुरुषोत्तम क्षेत्र असलेल्या पुरीमध्ये भगवान जगन्नाथाच्या भव्य मंदिराचे बांधकाम पूर्ण केले, तेव्हा समुद्रस्वामी वरुण देवाला आपल्या प्रभूचे दर्शन घेण्याची तीव्र इच्छा झाली. त्याला माहित होते की भगवान नारायण आता त्याच्या किनाऱ्यावर वास करत आहेत. या भक्तीने प्रेरित होऊन, वरुण देव मंदिराकडे निघाले. वरुण देव जलदेवता असल्यामुळे, त्यांच्या आगमनाने समुद्राच्या खवळलेल्या लाटांनी शहराच्या सीमा ओलांडून शहरात प्रवेश केला. काही क्षणातच पुरीचा मोठा भाग पाण्याखाली गेला आणि पाणी मंदिराच्या आवारात पोहोचले. ही काही सामान्य नैसर्गिक आपत्ती नव्हती, तर एका भक्ताची आपल्या देवतेला भेटण्याची तीव्र इच्छा होती, ज्यामुळे नकळतपणे पुरी धामाचे अस्तित्वच धोक्यात आले होते. ही परिस्थिती शहरातील रहिवाशांसाठी अत्यंत चिंताजनक होती. लोकांची घरे वाहून गेली आणि पिके नष्ट झाली. मग, आपल्या कळकळीच्या आर्त किंकाळ्या मारत सर्व नागरिक श्री जगन्नाथ धामात पोहोचले. त्यांनी महाप्रभूंच्या चरणी नतमस्तक होऊन आपली व्यथा सांगितली, "हे प्रभू, जर तुमची या नीलाचल धामात राहून तुमची सेवा करण्याची इच्छा असेल, तर कृपया आम्हाला या संकटातून वाचवा. वरुण देव तुमच्या दर्शनाच्या बहाण्याने आमचे शहर वारंवार बुडवत आहे. जर ही परिस्थिती अशीच राहिली, तर हे सुंदर शहर आणि तुमची सेवा करणारे भक्त कसे टिकतील? हे विश्वनाथा, हा विनाशकारी बाण थांबवा." तेव्हा महाप्रभूंच्या मनात एक गहन विचार आला. वरुण देवाचे प्रेम आता सर्व सीमा ओलांडत आहे. माझ्या दर्शनाची त्याची तहान माझ्या इतर भक्तांसाठी धोका बनली आहे. हे थांबवण्यासाठी, मला अशा रक्षकाची गरज आहे, ज्याच्याकडे अफाट शक्ती आणि अढळ संयम दोन्ही असतील. ज्याने माता सीतेचा शोध घेऊन माझ्या हृदयाची व्यथा दूर केली, तोच आज माझ्या शहरातील रहिवाशांची भीतीसुद्धा दूर करू शकतो. भगवंतांनी असे मानले की, वरुण देव हे जलतत्त्व आहेत आणि हनुमान वायूपुत्र आहेत. वायू पाण्याच्या लाटांवर नियंत्रण ठेवतो. म्हणूनच, जो समुद्र पार करू शकतो, तोच त्याला बांधू शकतो हे जाणून भगवंतांनी हनुमानाला पाचारण केले. हा नम्र सेवक धन्य आहे की, आपण त्याला पुन्हा एकदा आपल्या सेवेसाठी योग्य मानले. हे महान वीरा, या निळ्या जलाशयासमोर एका अभेद्य भिंतीप्रमाणे उभे राहा. वरुण देवाच्या पाण्याचा एकही थेंब माझ्या भक्तांच्या अंगणात पोहोचू नये. भगवन, मला तुमच्या आज्ञेचे गांभीर्य समजले आहे. माझ्या रामाच्या नावाच्या घोषणेपुढे समुद्राची गर्जना शांत होईल. तुमची आज्ञा माझ्यासाठी एक अमिट रेषा आहे, जी स्वतः वरुण देवदेखील ओलांडण्याचे धाडस करणार नाहीत. जय श्री जगन्नाथ. हे वायूपुत्रा, भगवंतांच्या भक्तांना दुःख देण्याचा माझा हेतू नव्हता. मला फक्त या भव्य मंदिरात स्थापित केलेल्या माझ्या प्रभूच्या नवीन मूर्ती पाहायच्या होत्या. लाटांचा तो उसळणारा जोर माझ्या भक्तीची प्रेरणा होती. हे वरुणा, भक्ती हीच सर्वोच्च भक्ती आहे जी जगाचे कल्याण करते, विनाश नाही. भगवान तुला तुझ्या मर्यादेत राहण्याची आज्ञा देतात. जर तू ही रेषा ओलांडलीस, तर माझी गदा आणि भगवंताचे सुदर्शन चक्र तुझा मार्ग अडवतील. होय. त्या वेळी भगवान जगन्नाथांना फक्त खिचडी, तांदूळ आणि डाळींपासून बनवलेला पदार्थ, अर्पण केला जात असे. तोच नैवेद्य हनुमानालाही दिला जात असे. पण हनुमानाने अयोध्येत राहताना विविध प्रकारच्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला होता. उत्तम खिचडी! हळूहळू, त्याला फक्त खिचडी खाऊन कंटाळा येऊ लागला. हनुमानाच्या मनात एक विचार येऊ लागला भगवंताचे



वैभव अथांग आहे आणि ही खिचडीही दिव्य आहे. मी वानरसेनेचा सेनापती आहे. मला गोड फळे आणि लाडूंची चव आवडते. भगवंताला माझ्या आवडीनिवडी आठवत नाहीत का? मला युगानुयुगे फक्त याच खिचडीवर जगावे लागेल का? खिचडी खाऊन कंटाळलेल्या आणि गोड पदार्थांची लालसा असलेल्या हनुमानाने एक युक्ती शोधून काढली. त्यांना माहित होते की भगवान जगन्नाथ, जे रामच आहेत, ते अजूनही अयोध्या आणि इतर ठिकाणी त्यांच्या आवडत्या प्रसादाचा आस्वाद घेतात. जेव्हा कधी वरुण समुद्र शांत व्हायचा, तेव्हा हनुमान गुपचूप आपले रक्षण सोडून आकाशातून उडत अयोध्या किंवा वाराणसीला जायचा. तिथे ते लाडू, मालपुआ आणि ताज्या फळांवर ताव मारायचे. त्यांना वाटायचे की भगवान ध्यानात मग्न आहेत. त्यांना हे कसे कळणार? मी पटकन प्रसाद खाऊन परत यायचो. पण जसा हनुमानजी दूर जायचे, तसा वरुण देव संधी साधायचा. समुद्राच्या लाटा पुन्हा मंदिराच्या भिंतींना धडकायच्या आणि पुरीला पूर येण्याचे संकट गडद व्हायचे. जेव्हा हे असेच चालू राहिले, तेव्हा भगवान जगन्नाथांच्या लक्षात आले की हनुमानजी खिचडीच्या प्रसादाने तृप्त झाले आहेत आणि केवळ चवीसाठी आपले कर्तव्य सोडून देत आहेत. "हनुमान, तू आपली जागा का सोडत आहेस? मी दिलेली खिचडी तुला आवडली नाही का?" "प्रभू, तुमची खिचडी अमृतासारखी आहे. पण या वानराला कधीकधी लाडूंची आठवण येते." हे महावीर, तुम्हाला माहीत आहे की माझ्या भक्तांच्या कल्याणापेक्षा माझ्यासाठी दुसरे काहीही महत्त्वाचे नाही. तुमचे सामर्थ्य आणि तुमची भक्ती दोन्ही अमर्याद आहेत. तुम्ही तुमच्या भावना माझ्यापासून लपवल्या नाहीत याचा मला आनंद आहे. पण हनुमान, पुरी धामाच्या रक्षणाची जबाबदारी केवळ तुझ्याच कणखर खांद्यांवर आहे. जर तू मोहाच्या आहारी जाऊन किनारा सोडलास, तर वरुण देव नियम मोडतील आणि माझे हजारो भक्त बुडून मरतील. हनुमान, तू स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत नाहीस. म्हणून, मी आता तुला प्रेम आणि कर्तव्याच्या या सुवर्ण साखळ्यांनी बांधत आहे. या साखळ्या तुला शिक्षा देण्यासाठी नाहीत, तर या ठिकाणी तुझी दृढता सिद्ध करण्यासाठी आहेत. जोपर्यंत तू जखडलेला आहेस, तोपर्यंत वरुण देवाच्या शक्तीचा तुझ्यावर विजय होणार नाही, आणि तू डगमगणारही नाहीस. हनुमानाने पाहिले की या साखळ्या केवळ सोन्याच्या निर्जीव वस्तू नव्हत्या. जेव्हा त्याने प्रत्येक कडी काळजीपूर्वक तपासली, तेव्हा त्याला प्रत्येक कडीवर 'राम' हे नाव कोरलेले दिसले. इतकेच नव्हे, तर त्या साखळ्यांमधून तोच मधुर नाद निघत होता, जो नेहमी हनुमानाच्या हृदयात निनादत असतो. राम राम राम, हे प्रभू, ही शिक्षा आहे असे समजण्याचा माझा किती अज्ञानीपणा होता. तुम्ही मला केवळ शिक्षेनेच नव्हे, तर तुमच्या नावानेही सुशोभित केले आहे. या साखळ्या सोन्याच्या नाहीत. ही तुमच्या नावाची शक्ती आहे. प्रभू, या जगात हनुमानासाठी रामाच्या नावाच्या बंधनापेक्षा मोठा मोक्ष नाही. हे अंजनीपुत्रा, जग तुला अनेक नावांनी ओळखते. पण येथे, तुझी कीर्ती 'जखडलेला हनुमान' अशी असेल. जगन्नाथ धामात येणारा प्रत्येक भक्त तुमचे हे रूप पाहून शिकेल की, केवळ देवाच्या नावाचे, रामाच्या नावाचे बंधनच आत्म्याला भटकण्यापासून रोखते. याच काठावरील महान महावीर नदीप्रमाणे तुम्ही माझ्या धामाचे रक्षण कराल. हनुमान, ऐक, आजपासून मी या संपूर्ण धामाच्या प्रतिष्ठेसाठी आणि तुम्हाला संतुष्ट करण्यासाठी एक नवीन परंपरा सुरू करत आहे. आजपासून, या मंदिराचे स्वयंपाकघर साक्षात महालक्ष्मीच्या संरक्षणाखाली असेल. आतापासून, केवळ खिचडीच नव्हे, तर छप्पन्न नैवेद्य असतील. यामध्ये तुमचे आवडते लाडू, मालपुआ आणि ते दिव्य पोडा पिठा यांचा समावेश असेल. ज्याच्या सुगंधाने देवदेखील स्वर्ग सोडून धावत येथे येतील. मी खात्री देतो की या ५६ पदार्थांची विविधता इतकी मोठी असेल की माझ्या भक्तांना दुसऱ्या कोणत्याही दाराकडे पाहण्याची गरज भासणार नाही. हनुमान, हे ५६ नैवेद्य माझ्यावरील आणि तुमच्यावरील तुमच्या प्रेमाचे प्रतीक असतील. आजपासून, जगन्नाथ पुरीचा महाप्रसाद जगातील सर्वात पवित्र अन्न असेल. त्याचे सेवन केल्याने मनुष्य जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त होईल. नील माधव, हे नील माधवा, मी मूठभर लाडूंच्या शोधात भटकत होतो. पण तू, माझ्या वेषात, संपूर्ण निर्जीव जगासाठी अमृताचे द्वार उघडलेस. आज या हनुमानाला जाणीव झाली की तुझ्या चरणांशिवाय इतरत्र सुख शोधणे ही केवळ एक मृत इच्छा आहे. हे भगवन, तुमचा जयजयकार असो. तुमच्या महान अर्पणांचा जयजयकार असो. हनुमानाने एका हातात आपली गदा धरली आणि दुसऱ्या हाताने आपल्या बेड्या कपाळावर ठेवल्या. भगवान जगन्नाथ मंद स्मितहास्य करत मंदिराच्या गर्भगृहात परतले. त्या दिवसापासून पुरीमध्ये महान अर्पण आणि छप्पन्न अर्पणांची परंपरा सुरू झाली. वरुणाने आपले मस्तक झुकवले आणि दरिया महावीर रूपात रूपांतरित झालेला हनुमान अनंतकाळासाठी जागरण करू लागला. आजही पुरीला भेट देणाऱ्या प्रत्येक भक्ताला हे माहीत आहे की, मंदिरातील शांती ही त्याच महावीरांच्या दक्षतेचा परिणाम आहे, ज्यांना देवाने स्वतः रामाच्या नावाच्या साखळ्यांनी बांधले होते. जगन्नाथांचा जयजयकार असो, दरिया महावीरांचा जयजयकार असो.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)